RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष ८, अंक २९] मंगळवार, नोव्हेंबर २२, २०२२/अग्रहायण १, शके १९४४ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ६०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**


| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.—** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश. .. .. | १-३ |


**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २२ नोव्हेंबर २०२२.

**MAHARASHTRA ORDINANCE No. XI OF 2022.**

AN ORDINANCE
FURTHER TO AMEND THE MAHARASHTRA AGRICULTURAL PRODUCE MARKETING (DEVELOPMENT AND REGULATION) ACT, 1963.

**सन २०२२ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११.**

**महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यामध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ; (१९६४ चा महा. २०.)

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत **:—**

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (सुधारणा) अध्यादेश, २०२२, असे म्हणावे.

(२) तो, तात्काळ अंमलात येईल.

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० याच्या कलम १३ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ याच्या कलम १३ मध्ये, पोट-कलम (१) मधील, खंड (अ) मध्ये, "ज्यांची संबंधित मतदारसंघाच्या मतदार यादीत नावे असतील असे आणि" हा मजकूर वगळण्यात येईल. १९६४ चा महा. २०.

## निवेदन

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ (१९६४ चा महा. २०) याच्या कलम १३ मध्ये शेतकरी, व्यापारी, अडते, हमाल व तोलारी यांच्या प्रतिनिधींचा समावेश असलेली कृषि उत्पन्न बाजार समिती घटित करण्याची तरतूद आहे.

**२.** ज्यांची नावे संबंधित मतदारसंघाच्या मतदार यादीत आहेत आणि जे कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या इतर निकषांची पूर्तता करतात अशा बाजार क्षेत्रात राहणाऱ्या शेतकऱ्यांमधून निवडून आलेल्या शेतकऱ्यांचा सध्या कृषि उत्पन्न बाजार समित्यांमध्ये समावेश होतो. कोणत्याही शेतकऱ्याला,—मग त्याचे नाव मतदार यादीत आहे किंवा नाही हे विचारात न घेता,- कृषि उत्पन्न बाजार समितीची निवडणूक लढविण्याचा हक्क असावा अशी तरतूद करणे शासनाला इष्ट वाटते. म्हणून, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या इतर निकषांची पूर्तता करणाऱ्या, बाजार क्षेत्रात राहणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना, कृषि उत्पन्न बाजार समित्यांची निवडणूक लढविणे शक्य व्हावे यासाठी, उक्त अधिनियमाच्या कलम १३ च्या पोट-कलम (१) च्या खंड (अ) मध्ये यथोचित सुधारणा करण्याचे प्रस्तावित केले आहे.

**३.** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई,
दिनांक २२ नोव्हेंबर २०२२.

**भगत सिंह कोश्यारी,**
महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**अनूप कुमार,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.